अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ । 

## ठाकरे बंधू एकत्र आले म्हणून मनसेच्या पाटलांनी जल्लोष केला अन् २४ तासात भाजपात गेले

नाशिक/प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंच्या युतीचा जल्लोष बुधवारी (२४ डिसेंबर) साजरा केला आणि गुरुवारी थेट भाजपमध्ये प्रवेश केला. नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्षांतर मनसेसाठी मोठा धक्का मानला जात असून, भाजपने विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांना गळाला लावण्याची रणनीती यशस्वी केली आहे. दिनकर पाटील यांच्यासह दोन माजी महापौर आणि इतर दिग्गज नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला, मात्र या प्रवेशाला भाजपच्या स्थानिक आमदार देवयानी फरांदे यांच्या गटाने तीव्र विरोध दर्शवला.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेना (उबाठा) आणि राज ठाकरेंच्या मनसे यांच्यातील युतीची घोषणा काल मुंबईत झाली. या युतीचे स्वागत करत नाशिकमध्ये मनसे आणि उबाठा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. दिनकर पाटील या जल्लोषात आघाडीवर होते. त्यांनी पेढे वाटले, ढोल-ताशे लावून नाचले आणि युतीच्या समर्थनात उत्साह दाखवला. मात्र, अवघ्या २४ तासांत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हा प्रवेश मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडला.

### युती आणि आघाडीचा आजचा निर्णायक दिवस : रात्र ‘फुल्ल’ अन् ‘फायनल’ करण्यात जागली

# अजितदादा राष्ट्रवादीची आघाडीत एंट्री?, ‘वंचित’ची एक्झिट!

# काँग्रेस उमेदवारीचा बॉम्ब, युतीचे एक घाव अन् दोन तुकडे!!

सोलापूर/प्रतिनिधी

विविध मुद्यांवरुन राजकीय राजकीय पटलावर चर्चेत आलेली सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक प्रमुख पक्षांमधील वेगवेगळ्या राजकीय घडामोडींनी अनपेक्षित टर्निंग पॉइंटवर गेली आहे. ७५ मॅजिक फिगर गाठण्याचा नारा दिलेल्या अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसची एंट्री महाविकास आघाडी होण्याचे स्पष्ट संकेत आहेत. तशा हालचाली अकलूजच्या ‘शिवरत्न’ बंगल्यावरुन बुधवार आणि गुरुवारी घडल्या. वंचित आघाडीने काँग्रेसलाच हात दाखवत महाविकास आघाडीसोबत न जाण्याचा निर्णय ऐनवेळी घेतला आहे. स्व:बळावर १०२ जागा लढण्याची ताकद नसलेल्या काँग्रेसने सर्वाधिक ५६ जागा स्वत:कडे घेत यापैकी पहिली ३० जागेच्या उमदेवारांच्या नावाचा बॉम्ब फोडण्याची तयारी दर्शवली. तर सर्वाधिक प्रतिक्षा लागून राहिलेल्या युतीच्या निर्णयासंदर्भात आज शुक्रवार (ता.२६) एक घाव अन् दोन तुकडे होणार आहेत. अपेक्षित ४० जागा भाजपकडून न सुटण्याच्या मुद्यावर शिंदे सेना आजच स्व:बळावर लढणं घोषित करुन शकते,अशी अत्यंत खात्रीलायक माहिती मिळाली आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर)

### दोन्ही राष्ट्रवादी आघाडीत आल्यास यापूर्वीचं जागा निश्चितपणे बदलणार

### पुणे-पिंपरी चिंचवड पॅटर्न सोलापुरात राबवण्यावर अजितदादांची भूमिका




राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातर्फे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची सोलापूर महापालिका निवडणूक प्रमुखपदी निवड केली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत भाजपचा उधळणारा अश्वमेघ रोखण्यसाठी दोन्ही राष्ट्रवादी मिळून लढण्याचा निर्णय घेतला आहे, तोच निर्णय सोलापूर महापालिकेसाठी राबवण्याचा खासदार मोहिते-पाटील यांचा प्रयत्न आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हा निर्णयास पाठिंबा द्यावा, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येऊन लढण्यावर शिक्कामोर्तब झाल्यास सोलापूर महापालिकेच्या इंद्रभुवात पहिल्यांदा मोहिते-पाटील पॅटर्न दिसू शकतो.

### इंद्रभुवनात अकलूजकर ‘मोहिते-पाटील’ पॅटर्न खासदार धैर्यशीलभैंयांची मिळून लढण्याची तयारी

**■ ॲड.बाळासाहेबांनी थेटच सांगून टाकलं अन् नूरच बदलला**

महाविकास आघाडीमधील मुख्य घटक पक्षांसह अन्य पक्षांच्या प्रतिनिधींची शिवसेनेचे उपनेते चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थित झालेल्या बैंठकीत महाविकास आघाडी करुन सोलापूर महापालिकेची निवडणूक लढण्याचा निर्णय झाला होता. वंचित बहुजन आघाडीला काँग्रेसच्या कोट्यातून जागा देण्याचं निश्चितदेखील झालं होतं. मात्र या पक्षाचे नेते ॲड. आंबेडकर यांनी काँग्रेसवर टिका करत कोणासोबत लढायचं हे पत्रकार परिषदेतून घोषित केल्यानं महाविकास आघाडीचा पंचाईत होणार आहे. आंबेडकरांच्या घोषणेनं आघाडीवाल्यांचा नूरच बदलला गेला.

**■ संबंध ताणले जाऊ न देता स्व:बळाचीच तयारी**

महायुती करुयात.त्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत असे जरी भाजप आणि शिंदे सेनेवाले सांगत असले तरी ‘आतून’ वेगळ्या हालचाली आहेत. स्व:बळावर लढण्याचीच उभतांची तयारी आहे. मात्र गरज पडल्यास सत्तेसाठी एकत्र येता यावं, यासाठी संबंध ताणले जाऊ द्यायचे, नाहीत अशीच भूमिका भाजप आणि शिंदे सेनेची असल्याचं सांगण्यात येतं.

**■ अजितदादा राष्ट्रवादीच्या प्रवेशानं काँग्रेसच्या जागेचं बदलू शकतं चित्र**

पुणे-पिंपरी चिंचवड महापालिकांसाठी राबवण्यात येणारा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय सोलापूर महापालिकेसाठी अजित पवारांच्या पुढाकारातून झाल्यास महाविकास आघाडीमधील जागा वाटपाचं चित्र निश्चितपणे बदलू शकतं. काँग्रेसनं स्वत:ला घेतलेल्या ५६ जागा पुन्हा या पक्षाकडं कशा राहतील हा महत्त्वाचा मुद्दा आहे. काँग्रेसची पहिली २० उमेदवारांची यादी गुरुवारी रात्री उशीरापर्यंत घोषित होईल,असे सांगण्यात आले. त्यानुसार यादीची प्रतिक्षा पक्षामधील इच्छुकांसह युतीमधील इच्छुक करत होते. शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना या संदर्भात संपर्क करण्याचा प्रयत्न झाला मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

## बंडखोरी टाळण्यासाठी भाजप थेट शेवटच्या दिवशी एबी फॉर्म देणार

सोलापूर/प्रतिनिधी

निवडणुकीसाठी अर्ज भरण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना अजूनही कोणत्याच पक्षाने अधिकृत उमेदवारी यादी जाहीर केलेली नाही. महायुतीची घोषणा खोळंबली आहे. भाजपमध्ये सर्वाधिक इच्छुक असून इनकमिंग अजून थांबलेले नाही. त्यामुळे उमेदवारी कोणाला द्यायची आणि बंडखोरी कशी थांबवायची असा प्रश्न श्रेष्ठींपुढे आहे. त्यावर तोडगा म्हणून शेवटच्या दिवशी एबी फॉर्म देणार असल्याची माहिती आहे.

महापालिका निवडणुकीसाठी २३ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज नेणे-भरणे प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत दोन हजार पेक्षा जास्त इच्छुकांनी अर्ज नेला आहे. मात्र दाखल एकानेही केला नाही. महापालिका निवडणुकीसाठी सुट्ट्या वगळता उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे ३ दिवस राहिले आहेत. असे असेले तरी भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची युती होणार की नाही याबाबत तर्कवितर्क सुरू आहेत. मात्र राज्य पातळीवर भाजप आणि सेनायुतीची बोलणी सुरू आहेत.

युती झाली नाही, इच्छुकांची संख्या मोठी असल्याने खासकरून भाजपमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. युती न झाल्यास दोन्ही पक्षांनी स्वबळाची तयारी सुरू केली आहे. मात्र भाजपमधील बंडखोर आणि तगडे उमेदवार गळाला लावण्यासाठी शिंदेसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसही तयार आहेत. त्यामुळे भाजपही सावध पावले टाकत आहेत. यादी लवकर जाहीर झाली तर बंडखोरी अटळ असल्याने जाणीवपूर्वक यादी लांबवली जात आहे. त्यामुळे बंडखोरी रोखण्यासाठी भाजपा शेवटच्या दिवशी उमेदवारी यादी जाहीर करण्याची शक्यता आहे किंवा थेट शेवटच्या दिवशी एबी फॉर्म देणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

**खा. शिंदे आज ए.बी. फॉर्म घेऊन येणार**

दुसरीकडे महाविकास आघाडीच्या बैठकावर बैठका सुरू आहेत. मात्र यामधून कोणताही ठोस निर्णय अद्याप झालेला नाही. काँग्रेसचे नेते गुरूवारी मुंबईत होते. तेथे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खा. प्रणिती शिंदे यांच्याशी चर्चा झाली आहे. शुक्रवार ए.बी. फॉर्म घेऊन खा. शिंदे सोलापुरात येणार आहेत. पहिली यादी २० जणांची जाहीर होईल, त्यांना फॉर्म देण्यात येतील, असे सांगण्यात आले.

**पर्याय नसल्याने महाआघाडी**

महाआघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार, शिवसेना या तीन पक्षांबरोबरच माकपा, मनसे आणि समाजवादी पार्टी महाविकास आघाडीत सामील आहे. प्रत्येक प्रभाग निहाय कोणाची किती ताकद आहे याचा आढावा घेतला आहे. काँग्रेसने ५५ ते ६० जागांची मागणी केली आहे. मुस्लिम बहुल भागांवर काँग्रेसचा दावा आहे. त्यामुळे सध्या महाआघाडीत तणाव आहे. मात्र पर्याय नसल्याने कोणत्याही परिस्थितीत महाआघाडी होईल, असे बोलले जात आहे.

**दादांच्या राष्ट्रवादीची यादी सोमवारी**

अजित पवार पक्षाने देखील उमेदवारी यादी जाहीर करण्यासाठी सोमवारचा दिवस निवडल्याचे सूत्रांनी सांगितले. भाजपाचे बंडखोर उमेदवार गळाला लागतात का याची चाचणी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



चला या निमित्ताने ’रेड कार्पेट’वर जायला मिळते !

कल्याण
238-32-200

मुंबई
670-39-450

## अडीच हजारांची लाच घेताना आरटीओचा निरीक्षक चतुर्भुज

सोलापूर : सोलापूर-विजयपूर रस्त्यावरील नांदणीजवळील आरटीओच्या चेकपोस्टवर अडीच हजार रूपयांची लाच घेताना प्रादेशिक परिवहन कार्यालया पिंपरी चिंचवडचा मोटार वाहन निरीक्षक तानाजी धुमाळ वय ४९ रा.३७ आयडीएल कॉलनी,कोथरूड पुणे याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या पथकाने रंगेहाथ पकडले.ही कारवाई गुरूवारी करण्यात आली.

गुजरात ते चेन्नई या मार्गावर एक मालवाहू ट्रेलर चालक नेहमी या मार्गावरून मालाची वाहतूक करत असतो.या अगोदर धुमाळ याने त्याच्याकडून २ हजाराची रक्कम घेतली होती.हा अधिकारी पुन्हा पैसे मागणार या शंकेने मालवाहतूकदाराने लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार केली होती.त्यानुसार जालन्याच्या कार्यालयातील पथकाने नांदणी येथे येवून धुमाळ याला लाच घेताना रंगेहाथ पकडले. धुमाळ याने अमोल पाटील वय.५० रा.अवंती नगर सोलापूर याच्यामार्फत ही लाच स्वीकारली.

खात्याचे पोलीस उप-अधीक्षक बाळू जाधवर यांनी धुमाळ याची अंगझडती घेतली.त्यावेळी किंमती मोबाईल,स्मार्ट घड्याळ,टेबलच्या ड्रॉवरमध्ये लाचेची रक्कम,त्याचबरोबर २४ हजार ३९० रूपये रोख असा ऐवज सापडला तसेच पाटील याच्याकडे ११ हजार८१० रोख रक्कम,पिवळ्या धातुच्या दोन अंगठ्या सापडल्या.रात्रीपर्यंत या दोघांवर मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

